मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482



# निवडणुकीसाठी एकजुटीने काम करा; महेश लांडगेंचे आवाहन!

## भाजपच्या आढावा बैठकीत मतदार संपर्क आणि प्रचार नियोजनावर भर!

» पिंपरी | प्रतिनिधी

**पुणे पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत भाजपच्या अधिकृत उमेदवारांना विजयी करण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने जबाबदारीने आणि एकजुटीने काम करावे. संघटनात्मक समन्वय मजबूत करून प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करावेत, असे आवाहन आमदार महेश लांडगे यांनी केले.**




पुणे पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर भोसरी विधानसभा मतदारसंघाच्या वतीने आयोजित भाजपच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला नगरसेवक, मंडल अध्यक्ष, प्रभारी, पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सहकारी उपस्थित होते. यावेळी निवडणुकीची पूर्वतयारी, प्रचार यंत्रणेचे नियोजन, मतदार संपर्क आणि संघटनात्मक समन्वयाचा आढावा घेण्यात आला.

पुणे पदवीधर मतदारसंघाच्या भाजपच्या अधिकृत उमेदवार डॉ. स्मिता योगेश जाधव आणि पुणे शिक्षक मतदारसंघाचे उमेदवार कौस्तुभ मुरलीधर गावडे यांना पहिल्या पसंतीचे मत देऊन विजयी करण्यासाठी संपर्क अभियानाला गती देण्याचे आवाहन लांडगे यांनी केले. प्रत्येक मंडळातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आपापल्या जबाबदाऱ्या निश्चित करून मतदारांशी थेट संवाद साधावा, असे त्यांनी सांगितले.

निवडणुकीच्या प्रचारात प्रत्येक कार्यकर्त्याची भूमिका महत्त्वाची असून, मतदारांपर्यंत पोहोचताना कोणतीही उणीव राहू नये, याची काळजी घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांचे जाळे अधिक सक्रिय करून मतदार संपर्क वाढवावा आणि उमेदवारांची माहिती प्रभावीपणे पोहोचवावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पुणे पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी शुक्रवार, २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान होणार असल्याच्या पार्श्वभूमीवर बैठकीत निवडणूक तयारीवर चर्चा करण्यात आली. पात्र पदवीधर आणि शिक्षक मतदारांशी संपर्क साधून त्यांचे प्रश्न समजून घेण्यासह पक्षाच्या अधिकृत उमेदवारांच्या प्रचाराला प्राधान्य देण्याचे आवाहन करण्यात आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि पक्षश्रेष्ठींच्या मार्गदर्शनानुसार पुण्यासह पाचही जागांवर विजय मिळवण्यासाठी कार्यकर्त्यांनी एकदिलाने प्रयत्न करावेत, असे लांडगे यांनी सांगितले. संघटनेची ताकद, कार्यकर्त्यांची ऊर्जा आणि नियोजनबद्ध प्रचाराच्या माध्यमातून निवडणुकीत यश मिळवण्याचा निर्धार या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

### पाचही जागांवर विजय मिळवण्याचा निर्धार!

पुणे पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत भाजपच्या अधिकृत उमेदवारांना विजयी करण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने एकजुटीने आणि नियोजनबद्ध पद्धतीने काम करावे. मतदारांशी थेट संपर्क साधून उमेदवारांची माहिती पोहोचवावी आणि प्रचार यंत्रणा अधिक सक्रिय करावी, असे आवाहन आमदार महेश लांडगे यांनी भोसरीतील आढावा बैठकीत केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली पुण्यासह पाचही जागांवर विजय मिळवण्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रयत्न करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त केला.

# फेक इन्स्टाग्राम आयडीवरून ब्लॅकमेलिंग; आरोपीला अटक!

» पिंपरी | प्रतिनिधी

**इन्स्टाग्रामवर बनावट अकाउंट तयार करून खासगी फोटोच्या आधारे तरुणाला ब्लॅकमेल करत ५० हजार रुपयांची खंडणी मागणाऱ्या आणि त्याच्या मैत्रिणीकडे शारीरिक संबंधांची मागणी करणाऱ्या आरोपीला पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या खंडणी विरोधी पथकाने अटक केली आहे. हनुमान सुभाष खरात (वय ३५, मूळ रा. वरुडी, ता. सिंदखेडराजा, जि. बुलढाणा) असे आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून मोटारसायकल, मोबाईल, पाकीट, आधारकार्ड आणि इतर साहित्य असा एकूण एक लाख चार हजार १३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने 'RUCHITA NIKARN93' या नावाने इन्स्टाग्रामवर बनावट अकाउंट तयार केले होते. या अकाउंटवरून फिर्यादी तरुणाशी संपर्क साधून त्याला एका मुलीच्या खासगी अवयवांचा फोटो पाठवण्यात आला. त्यानंतर तरुणाला स्वतःचा खासगी फोटो पाठवण्यास सांगण्यात आले. तरुणाने फोटो पाठवल्यानंतर आरोपीने त्यांच्यातील संभाषण एका अनोळखी मोबाईल क्रमांकाच्या व्हॉट्सअ‍ॅपवर पाठवले.

त्यानंतर आरोपीने तरुणाला त्याचे खासगी फोटो कामाच्या ठिकाणी असलेल्या कार्यालयीन मोबाईलवर तसेच तो पार्टटाइम नोकरी करत असलेल्या ठिकाणी पाठवण्याची धमकी दिली. फोटो प्रसारित करायचे नसतील, तर ५० हजार रुपये द्यावे लागतील, अशी मागणी करण्यात आली. पैसे न दिल्यास जीवे मारण्याची धमकीही दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. मैत्रिणीकडेही शारीरिक संबंधांची मागणी आरोपीने तरुणाच्या मैत्रिणीच्या व्हॉट्सअ‍ॅपवर संदेश पाठवून, गणेशला त्रास होऊ द्यायचा नसेल तर माझ्यासोबत शारीरिक संबंध ठेव किंवा पैसे पाठव, अशी मागणी केली. तसे न केल्यास वायसीएम रुग्णालयात आपले अनेक मित्र असून ते गणेशला मारहाण करतील, अशी धमकीही दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

याशिवाय, 'BHALCHANDRA AHER' या नावाच्या फेसबुक अकाउंटवरूनही फिर्यादीला संदेश पाठवून धमकावण्यात आले. रुचिता नावाची मुलगी आणि तिचा मित्र ऐकत नसून ते सायबर पोलिसांकडे तक्रार करणार असल्याचे सांगून आरोपीने दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी संत तुकारामनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तांत्रिक तपासातून आरोपीचा शोध गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या खंडणी विरोधी पथकाने संबंधित मोबाईल क्रमांकाचा तांत्रिक तपास सुरू केला. या तपासातून हनुमान सुभाष खरात याचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेण्यात आले.

# विधान परिषदेच्या 5 जागांसाठी उद्या मतदान!

## १०.६८ लाख मतदार बजावणार मतदानाचा हक्क; २७ ऑक्टोबरला मतमोजणी

**»» पिंपरी | प्रतिनिधी**

**महाराष्ट्र विधान परिषदेच्या पाच पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी शुक्रवार, २३ ऑक्टोबर रोजी मतदान होणार आहे. औरंगाबाद, पुणे आणि नागपूर विभागातील तीन पदवीधर, तसेच अमरावती आणि पुणे विभागातील दोन शिक्षक मतदारसंघांसाठी ही निवडणूक होत आहे. पाचही जागांसाठी एकूण १८२ उमेदवार निवडणूक रिंगणात असून, १० लाख ६८ हजार ७२ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदानासाठी एकूण २ हजार ४१९ केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत मतदान प्रक्रिया पार पडणार आहे.**



निवडणूक प्रक्रिया निष्पक्ष, पारदर्शक आणि निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. पाचही मतदारसंघांतील विद्यमान सदस्यांचा कार्यकाळ ६ डिसेंबर २०२६ रोजी संपुष्टात येत असल्याने भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार ही निवडणूक घेतली जात आहे. मतदानानंतर मंगळवार, २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार असून, संपूर्ण निवडणूक प्रक्रिया ३१ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण केली जाणार आहे.

पाचही मतदारसंघांमध्ये एकूण १८२ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. यामध्ये पुणे विभाग पदवीधर मतदारसंघातून सर्वाधिक ४७ उमेदवार रिंगणात आहेत. औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघातून ४१, नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघातून ३८, पुणे विभाग शिक्षक मतदारसंघातून ३०, तर अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघातून २६ उमेदवार निवडणूक लढवत आहेत.

पुणे पदवीधर मतदारसंघातील उमेदवारांची संख्या सर्वाधिक असल्याने या मतदारसंघाकडे विशेष लक्ष लागले आहे. मतदारांचा कौल कोणाच्या बाजूने जाणार, याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता आहे. पाचही मतदारसंघांतील उमेदवारांचे राजकीय भवितव्य मतदारांच्या मतदानातून निश्चित होणार आहे.

मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी पाचही मतदारसंघांत एकूण २ हजार ४१९ मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत. यामध्ये औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघात ८४२, पुणे विभाग पदवीधर मतदारसंघात ७४१, नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघात ४४५, पुणे विभाग शिक्षक मतदारसंघात ३१० आणि अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघात ८१ मतदान केंद्रांचा समावेश आहे.

पाचही मतदारसंघांत मिळून १० लाख ६८ हजार ७२ मतदारांची नोंद आहे. त्यापैकी पुणे विभाग पदवीधर मतदारसंघात सर्वाधिक ३ लाख ८८ हजार १९ मतदार आहेत. तर अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघात सर्वांत कमी ३५ हजार ८१० मतदार आहेत. मतदानाच्या दिवशी कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि मतदारांना मतदान करताना अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी आवश्यक व्यवस्था करण्यात आली आहे.

विधान परिषदेच्या या पाच जागांवरील विद्यमान सदस्यांचा कार्यकाळ ६ डिसेंबर २०२६ रोजी संपत आहे. यामध्ये औरंगाबाद पदवीधर मतदारसंघाचे सतीश भानुदासराव चव्हाण, पुणे पदवीधर मतदारसंघाचे अरुण गणपती लाड, नागपूर पदवीधर मतदारसंघाचे अभिजीत गोविंदराव वंजारी, अमरावती शिक्षक मतदारसंघाचे किरण रामराव सरनाईक आणि पुणे शिक्षक मतदारसंघाचे जयंत दिनकर आसगावकर यांचा समावेश आहे.

विद्यमान सदस्यांचा कार्यकाळ संपण्यापूर्वी नवीन सदस्य निवडण्यासाठी ही निवडणूक घेण्यात येत आहे. आता शुक्रवारच्या मतदानानंतर मंगळवारी होणाऱ्या मतमोजणीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मतमोजणीनंतर पाचही मतदारसंघांतील निकाल स्पष्ट होणार असून, कोणत्या उमेदवाराला मतदारांचा कौल मिळतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# स्पाईन रोडवर पिण्याच्या पाण्याची नासाडी; ठेकेदारावर कारवाईची मागणी

**»» पिंपरी | प्रतिनिधी**

**घरकुल स्पाईन रोडवरील सर्व्हिस रोडवर आरंभ हॉटेलशेजारी पिण्याच्या पाण्याची मोठी पाइपलाइन फुटल्याने हजारो लिटर पाणी वाया जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. गेल्या तीन तासांपासून पाइपलाइनमधून पाणी वाहत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेची तातडीने दखल घेऊन पाण्याची नासाडी थांबवावी आणि पाइपलाइन फुटण्यास जबाबदार असलेल्या ठेकेदारावर कारवाई करावी, अशी मागणी मारुती गणपत जाधव यांनी महापालिका प्रशासनाकडे केली आहे.**





शहरातील अनेक भागांमध्ये नागरिकांना अपुऱ्या पाणीपुरवठ्याचा सामना करावा लागत असून, पाण्यासाठी नागरिकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत घरकुल स्पाईन रोडवर पिण्याच्या पाण्याची पाइपलाइन फुटून हजारो लिटर पाणी वाया जात असल्याचा प्रकार समोर आल्याने नागरिकांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे. पिण्याच्या पाण्याचे महत्त्व लक्षात घेता, अशा प्रकारे पाण्याची नासाडी होणे ही गंभीर बाब असल्याचे मारुती गणपत जाधव यांनी म्हटले आहे.

पाइपलाइन नेमकी कोणत्या कारणामुळे फुटली, संबंधित ठेकेदाराकडून सुरू असलेल्या कामादरम्यान आवश्यक ती खबरदारी घेण्यात आली होती का, तसेच पाइपलाइन फुटल्यानंतर दुरुस्ती करण्यासाठी संबंधित यंत्रणेकडून तातडीने पावले उचलण्यात आली का, याची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. पाइपलाइन फुटल्यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी वाहून जात असताना त्याकडे दुर्लक्ष होत असेल, तर ही बाब गंभीर असून, संबंधित विभागाने या घटनेची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी जाधव यांनी केली आहे.

महापालिका प्रशासनाने या घटनेची तातडीने दखल घेऊन घटनास्थळी संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना पाठवावे. फुटलेल्या पाइपलाइनची त्वरित दुरुस्ती करून पाण्याची नासाडी थांबवावी. तसेच, पाइपलाइन फुटण्यामागे ठेकेदाराच्या कामातील निष्काळजीपणा कारणीभूत असल्याचे चौकशीत स्पष्ट झाल्यास संबंधित ठेकेदारावर नियमानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

एकीकडे महापालिका प्रशासनाकडून नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन केले जाते, तर दुसरीकडे पिण्याच्या पाण्याची पाइपलाइन फुटून तासन्तास पाणी वाया जात असल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे पाण्याची बचत करण्याबाबत प्रशासनाची भूमिका आणि प्रत्यक्षात होत असलेली पाण्याची नासाडी यामध्ये विसंगती असल्याचा मुद्दा जाधव यांनी उपस्थित केला आहे. पाण्यासारख्या अत्यावश्यक संसाधनाची नासाडी रोखण्यासाठी महापालिकेने केवळ सूचना न देता अशा घटनांवर तातडीने आणि प्रभावी कारवाई करणे गरजेचे असल्याचेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, घरकुल स्पाईन रोडवरील या घटनेमुळे पाणीपुरवठा विभागाच्या देखरेखीवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. पाइपलाइन फुटल्यानंतर संबंधित यंत्रणेला माहिती मिळाली होती का, दुरुस्तीच्या कामात विलंब झाला असल्यास त्यामागील कारण काय, तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कोणती खबरदारी घेतली जाणार, याबाबत महापालिका प्रशासनाने स्पष्ट भूमिका मांडावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# पुणे विद्यापीठाच्या 23 ऑक्टोबरच्या परीक्षा पुढे ढकलल्या!

## शिक्षक व पदवीधर मतदारसंघांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निर्णय!

» पिंपरी | प्रतिनिधी

**शिक्षक व पदवीधर मतदारसंघांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. विद्यापीठातर्फे २३ ऑक्टोबर रोजी नियोजित असलेल्या सर्व परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने यासंदर्भात अधिकृत परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. त्यामुळे या दिवशी परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना नव्या वेळापत्रकाची प्रतीक्षा करावी लागणार आहे.**



निवडणूक प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विविध शासकीय यंत्रणांमधील कर्मचाऱ्यांची निवडणुकीच्या कामासाठी नियुक्ती केली जाण्याची शक्यता आहे. मतदानाची तयारी, प्रशासकीय कामकाज आणि निवडणुकीशी संबंधित विविध जबाबदाऱ्यांमुळे संबंधित कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण येऊ शकतो. अशा परिस्थितीत परीक्षा सुरळीत पार पाडताना अडचणी निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने परीक्षा नियोजनात बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. निवडणुकीच्या कामकाजाचा परीक्षेवर परिणाम होऊ नये, तसेच विद्यार्थी, शिक्षक आणि परीक्षा प्रक्रियेशी संबंधित कर्मचाऱ्यांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश असल्याचे मानले जात आहे.

विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकानुसार, २३ ऑक्टोबर रोजी नियोजित असलेल्या सर्व परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. या दिवशी विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी या बदलाची नोंद घेणे आवश्यक आहे. परीक्षा पुढे ढकलण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यासाचे नियोजन त्यानुसार करावे. तसेच, परीक्षेसंदर्भात कोणताही संभ्रम निर्माण होऊ नये, यासाठी विद्यापीठाकडून प्रसिद्ध होणाऱ्या अधिकृत सूचनांचे पालन करावे.

दरम्यान, पुढे ढकलण्यात आलेल्या परीक्षांच्या सुधारित तारखा अद्याप स्वतंत्र परिपत्रकाद्वारे जाहीर करण्यात येणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना नवीन वेळापत्रकासाठी विद्यापीठाच्या पुढील घोषणेची प्रतीक्षा करावी लागणार आहे. परीक्षा कधी होणार, याबाबतची अधिकृत माहिती उपलब्ध झाल्यानंतर विद्यार्थ्यांना त्यानुसार पुढील नियोजन करता येणार आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. डॉ. राजेंद्र तलवारे यांनी यासंदर्भात माहिती दिली आहे. त्यामुळे २३ ऑक्टोबर रोजी परीक्षा नियोजित असलेल्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध होणाऱ्या परिपत्रकांकडे लक्ष ठेवावे. सुधारित वेळापत्रक जाहीर झाल्यानंतर त्यानुसार परीक्षेची तयारी आणि नियोजन करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

### विद्यार्थ्यांनी नवीन वेळापत्रकाकडे लक्ष द्यावे!

२३ ऑक्टोबर रोजी नियोजित असलेल्या सर्व परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. शिक्षक व पदवीधर मतदारसंघांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने हा निर्णय घेतला आहे. निवडणूक प्रक्रियेसाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि शासकीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती होण्याची शक्यता असल्याने परीक्षा नियोजनात बदल करण्यात आला आहे. पुढे ढकलण्यात आलेल्या परीक्षांच्या सुधारित तारखा स्वतंत्र परिपत्रकाद्वारे जाहीर केल्या जाणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या अधिकृत सूचनांकडे लक्ष ठेवून नवीन वेळापत्रकानुसार परीक्षेची तयारी करावी.

# मतदानाच्या दिवशी पाच गावांतील आठवडे बाजार बंद!

» पिंपरी | प्रतिनिधी

**पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीची मतदान प्रक्रिया शांततेत, सुरळीत आणि निर्भय वातावरणात पार पडावी, यासाठी पुणे जिल्हा प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. जिल्ह्यातील मतदान केंद्रे निश्चित करण्यात आलेल्या पाच गावांमधील आठवडे बाजार मतदानाच्या दिवशी बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले आहेत. या निर्णयामुळे संबंधित गावांमधील आठवडे बाजार शुक्रवारी भरणार नाहीत.**



निवडणुकीच्या दिवशी मतदान केंद्रांच्या परिसरात नागरिकांची गर्दी होऊ नये, तसेच मतदान प्रक्रियेत कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाकडून खबरदारी घेण्यात येत आहे. आठवडे बाजाराच्या दिवशी खरेदी-विक्रीसाठी मोठ्या संख्येने नागरिक, व्यापारी आणि विक्रेते एकत्र येतात. त्यामुळे बाजार सुरू राहिल्यास मतदान केंद्रांच्या परिसरात गर्दी वाढण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेऊन प्रशासनाने संबंधित गावांतील आठवडे बाजार बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रशासकीय उपाययोजनांचा भाग म्हणून हे आदेश देण्यात आले आहेत. मतदान केंद्रांवर मतदारांना कोणतीही अडचण येऊ नये, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये आणि निवडणूक प्रक्रियेवर गर्दीचा परिणाम होऊ नये, यासाठी हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. या पाच गावांतील आठवडे बाजार राहणार बंद जिल्हा प्रशासनाच्या आदेशानुसार, आंबेगाव तालुक्यातील पारगाव तर्फे अवसरी बुद्रुक आणि घोडेगाव, इंदापूर तालुक्यातील बावडा, खेड तालुक्यातील राजगुरुनगर तसेच बारामती तालुक्यातील लोणी भापकर या पाच गावांमधील आठवडे बाजार बंद राहणार आहेत. त्यामुळे या गावांमध्ये आठवडे बाजारासाठी येणाऱ्या व्यापारी, विक्रेते आणि नागरिकांनी या निर्णयाची नोंद घेणे आवश्यक आहे.

संबंधित गावांतील बाजार समित्या, व्यापारी, ग्रामपंचायती आणि नागरिकांनी प्रशासनाच्या आदेशांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. मतदानाच्या दिवशी बाजार भरवून आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधित व्यक्ती किंवा घटकांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

दरम्यान, पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. मतदान प्रक्रिया शांततेत आणि कोणत्याही अनुचित प्रकाराविना पार पडावी, यासाठी नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### आदेश मोडल्यास कारवाई!

मतदानाच्या दिवशी गर्दी टाळण्यासाठी पारगाव तर्फे अवसरी बुद्रुक, घोडेगाव, बावडा, राजगुरुनगर आणि लोणी भापकर येथील आठवडे बाजार बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले आहेत. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

# म्हाडाच्या 4,462 घरांसाठी दोन लाखांहून अधिक अर्ज!

## तांत्रिक अडचणींमुळे अर्ज प्रक्रियेला ३० ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ; सोडत लांबणीवर!

**» पुणे | प्रतिनिधी**

**म्हाडाच्या पुणे मंडळातर्फे जाहीर करण्यात आलेल्या ४,४६२ घरांच्या सोडतीला अर्जदारांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. घरांच्या सोडतीसाठी आतापर्यंत दोन लाख ११ हजार ४१४ अर्ज सादर झाले आहेत. त्यापैकी एक लाख ४१ हजार ४१७ अर्जदारांनी अनामत रकमेसह अर्ज दाखल केले आहेत. मात्र, दुसरीकडे अर्ज नोंदणी, कागदपत्रांची पडताळणी आणि अर्ज सादर करण्याच्या प्रक्रियेत सातत्याने तांत्रिक अडचणी येत असल्याने अर्जदारांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. या अडचणींमुळे म्हाडा पुणे मंडळाला अर्ज प्रक्रियेसाठी तिसऱ्यांदा मुदतवाढ द्यावी लागली आहे. आता अर्जदारांना ३० ऑक्टोबरपर्यंत अर्ज सादर करता येणार आहेत.**



पुणे मंडळाला १५ टक्के एकात्मिक योजना आणि २० टक्के सर्वसमावेशक योजनेअंतर्गत प्राप्त झालेल्या ४,४६२ घरांसाठी २४ ऑगस्टपासून नोंदणी तसेच अर्जविक्री आणि स्वीकृती प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. या सोडतीच्या माध्यमातून स्वतःच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी हजारो नागरिकांनी अर्ज करण्यास सुरुवात केली. मात्र, अर्ज प्रक्रियेदरम्यान विविध तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याने अनेक अर्जदारांना नोंदणी करणे, आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे आणि अर्ज पूर्ण करण्यासाठी अडथळ्यांचा सामना करावा लागला.

या अडचणी लक्षात घेऊन मंडळाने यापूर्वी दोनदा मुदतवाढ दिली होती. त्यानंतर १६ ते २० ऑक्टोबरदरम्यान महाआयटी प्रणाली बंद असल्यामुळे अर्जदारांच्या कागदपत्रांची पडताळणी रखडली. परिणामी, अर्ज प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी पुरेसा वेळ मिळावा, या उद्देशाने मंडळाने पुन्हा मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार नोंदणी, अर्जविक्री आणि स्वीकृतीची अंतिम मुदत आता ३० ऑक्टोबरपर्यंत वाढवण्यात आली आहे. मंडळाचे मुख्य अधिकारी राहुल साकोरे यांनी यासंदर्भात माहिती दिली असून, सुधारित वेळापत्रक लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. अनामत रकमेसह अर्जांची संख्या वाढण्याची शक्यता म्हाडाच्या घरांसाठी अर्ज सादर करणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी असली, तरी सोडतीमध्ये सहभागी होण्यासाठी अनामत रकमेसह अर्ज सादर करणे महत्त्वाचे आहे. आतापर्यंत दोन लाख ११ हजार ४१४ अर्ज दाखल झाले असताना, त्यापैकी एक लाख ४१ हजार ४१७ अर्ज अनामत रकमेसह प्राप्त झाले आहेत. त्यामुळे अनेक अर्जदारांची प्रक्रिया अद्याप पूर्ण होणे बाकी असल्याचे दिसून येते.

आता अर्ज सादर करण्यासाठी आठवडाभराची अतिरिक्त मुदत मिळाल्याने अनामत रकमेसह दाखल होणाऱ्या अर्जांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता आहे. अंतिम मुदतीपर्यंत अशा अर्जांची संख्या दोन लाखांपर्यंत पोहोचू शकते, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र, प्रत्यक्षात सोडतीमध्ये सहभागी होणाऱ्या अर्जदारांची संख्या अंतिम पात्र अर्जांची यादी जाहीर झाल्यानंतरच स्पष्ट होणार आहे.

म्हाडाच्या घरांच्या किमती, उपलब्ध घरांची संख्या आणि अर्जदारांमध्ये निर्माण झालेली स्पर्धा यामुळे या सोडतीकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. विशेषतः पुणे आणि परिसरात स्वतःचे घर घेऊ इच्छिणाऱ्या नागरिकांसाठी ही सोडत महत्त्वाची मानली जात आहे. त्यामुळे अर्ज प्रक्रियेत येणाऱ्या तांत्रिक अडचणी दूर करून अर्जदारांना प्रक्रिया करण्यासाठी पुरेसा वेळ मिळणे आवश्यक ठरत आहे.

# पुण्यात ७५ किमीचे सायकल ट्रॅक नव्याने विकसित होणार!

**» पुणे | प्रतिनिधी**

**एकेकाळी ‘सायकलींचे शहर’ म्हणून ओळख असलेल्या पुण्यात सायकलस्वारांसाठी सुरक्षित आणि सलग मार्गांचे जाळे विकसित करण्याची तयारी महापालिकेने सुरू केली आहे. शहरात यापूर्वी कोट्यवधी रुपये खर्चून उभारण्यात आलेले सायकल ट्रॅक अतिक्रमणे, वाहनांचे पार्किंग, देखभालीचा अभाव आणि रस्ते रुंदीकरणामुळे अनेक ठिकाणी वापरण्यायोग्य राहिलेले नाहीत. त्यामुळे जुन्या सायकल ट्रॅकची दुरुस्ती करून त्यातील अपूर्ण जोडण्या पूर्ण करण्यावर महापालिका भर देणार आहे. पहिल्या टप्प्यात ७५ किलोमीटरचे सलग आणि सुरक्षित सायकल मार्ग विकसित करण्याचे नियोजन असून, पुढील टप्प्यात हे जाळे १३६ किलोमीटरपर्यंत विस्तारण्याचा विचार आहे.**




जुन्या सायकल ट्रॅकची दुरवस्था; नव्याने नियोजन शहरातील वाहतूक कोंडी कमी करणे, खासगी वाहनांवरील अवलंबित्व घटवणे आणि पर्यावरणपूरक वाहतुकीला प्रोत्साहन देणे, या उद्देशाने २०१६-१७ च्या सुमारास पुण्यात सायकल ट्रॅक उभारण्याचे नियोजन करण्यात आले होते. त्यासाठी विविध रस्त्यांवर सायकल मार्ग विकसित करण्यात आले. मात्र, अनेक ठिकाणी हे मार्ग सलग न राहिल्याने सायकलस्वारांना अडचणींचा सामना करावा लागला.

काही ठिकाणी सायकल ट्रॅकवर वाहनांचे पार्किंग केले जाते, तर काही भागांत फेरीवाल्यांची अतिक्रमणे आणि इतर अडथळे निर्माण झाले आहेत. रस्ते व पदपथांच्या रुंदीकरणाच्या कामांमुळेही काही ट्रॅकचे अस्तित्व कमी झाले आहे. परिणामी, स्वतंत्र सायकल मार्ग उपलब्ध असूनही त्यांचा अपेक्षित वापर होत नसल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर केवळ नवीन ट्रॅक उभारण्याऐवजी अस्तित्वातील मार्गांची दुरुस्ती, देखभाल आणि सलगता यावर लक्ष केंद्रित करण्याची गरज निर्माण झाली आहे.

७५ किलोमीटरच्या मार्गांचे सादरीकरण पुणे महापालिकेत नुकत्याच झालेल्या बैठकीत ‘इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सपोर्टेशन अँड डेव्हलपमेंट पॉलिसी’ (आयटीडीपी) या संस्थेने प्रस्तावित ७५ किलोमीटरच्या सायकल मार्गांबाबत सादरीकरण केले. शहरातील सध्याच्या सायकल ट्रॅकची स्थिती, अपूर्ण जोडण्या, पायाभूत सुविधांमधील त्रुटी आणि सायकलस्वारांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजनांवर या वेळी चर्चा करण्यात आली.

महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी संबंधित विभागाला सध्याच्या सायकल मार्गांचा आढावा घेऊन त्यातील त्रुटी दूर करण्याचे आणि अपूर्ण जोडण्या पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. सायकलस्वारांना एका मार्गावरून दुसऱ्या मार्गावर सुरक्षितपणे जाता यावे, तसेच त्यांना वारंवार मुख्य रस्त्यावरील वाहतुकीतून मार्ग काढावा लागू नये, यासाठी सलग मार्ग विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे.

गणेशखिंड रस्त्यावर दोन्ही बाजूंना ट्रॅकचा विचार गणेशखिंड रस्त्यावर दोन्ही बाजूंना सायकल ट्रॅक विकसित करण्याच्या प्रस्तावाचाही विचार सुरू आहे. यापूर्वी या रस्त्याच्या एका बाजूला सायकल ट्रॅक तयार करण्यात आला होता. आता दोन्ही बाजूंना सायकलस्वारांसाठीउपलब्ध करून देण्याबाबत चर्चा होत आहे.